

## दंडवते यांच्या भाषणाने लोकसभा हेलावली
## फ्रँक अँथनींच्या अनौचित्याने वातावरणाचा बेरंग

*२१ जानेवारी १९८५*

नव्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनाची 'नवलाई' मोठ्या प्रसन्न वातावरणात गेल्या आठवड्यात सुरू झाली. सत्तारूढ पक्षाची फुललेली बाग व विरोधी पक्षांचे उजाड माळरान अशी अवस्था असली; तरी आरंभ एकूण छान झाला. सदनात विरोधी पक्षांच्या बाकावरील अटलबिहारी वाजपेयी, चंद्रशेखर, सत्यसाधन चक्रवर्ती, रामविलास पासवान, हेमवतीनंदन बहुगुणा, रामावतार शास्त्री, हरिकेश बहादूर यांची अनुपस्थिती क्षणोक्षणी जाणवत होती; तर सत्तारूढ पक्षाच्या बाकावर श्रीमती इंदिरा गांधी व यशवंतराव चव्हाण आता कधीच दिसणार नाहीत, याचे दु:ख वाटत होते.

सत्तारूढ पक्षाला प्रचंड बहुमत मिळाले असले; तरी विरोधकांबद्दल उदारपणाची भूमिका घेण्याचे पंतप्रधान राजीव गांधी यांचे धोरण स्वागतार्ह आहे. विरोधकांना मात्र संसदेत स्वतंत्रतेची प्रतिमा मोठ्या मेहनतीने उभारावी लागेल, हे नाकारता येत नाही. जगजीवनराम, चरणसिंग या दिग्गजांना संसदीय कामकाजात रस नाही.

### सौम्यप्रकृती माधव रेड्डी

तेलगू देशमची मंडळी प्रथमच लोकसभेत आली आहेत. ते नवखे आहेत. त्यांचे लोकसभेतील एकसष्ट वर्षांचे नेते माधव रेड्डी हे सौम्य प्रकृतीचे गृहस्थ आहेत. प्रथमच एक प्रादेशिक पक्ष आता राष्ट्रीय पातळीवरचा विरोधी पक्ष बनला आहे. 'आम्ही अण्णा द्रमुक पक्ष सोडून अन्य सर्व विरोधी पक्षांशी सहकार्य करू; केवळ आंध्रचेच नव्हे तर अन्य राज्यांतील प्रश्नही हिरिरीने सभागृहात मांडू. आमच्या सर्व खासदारांना आम्ही विषय व राज्ये वाटून दिली असून ते त्याचा सखोल अभ्यास करतील.' असे रेड्डींनी सांगितले. स्वत: माधव रेड्डी ५२ ते ५७ या काळात खासदार होते. उस्मानिया विद्यापीठातून एम.ए. (अर्थशास्त्र) पदवी घेतलेले रेड्डी हे मूळचे समाजवादी. अशोक

मेहता, चंद्रशेखर यांच्याबरोबर ते काँग्रेसमध्ये गेले. आणीबाणीत त्यांनी काँग्रेस पक्ष सोडला व ते जनतात सामील झाले. त्यानंतर लोकदलात ते काही काळ राहिले व जून ८३ मध्ये ते तेलगू देशम पक्षात आले. आपल्या २८ खासदारांत १२ एकदम नवे चेहरे असून ते पूर्वी कधी आमदारही नव्हते, असे ते म्हणाले. उरलेल्या खासदारांत विधानसभेतील अनुभवी मंडळी एन. व्यंकटरामन हे माजी सभापती आहेत, केंद्रीय मंत्री विजय भास्कर रेड्डींना पराभूत केलेले अय्यपा रेड्डी हे माजी मंत्री व विरोधी पक्ष नेते आहेत, व्ही. तुळशीराम हे माजी खासदार, राज्यमंत्री, व्यंकटसुबय्या यांना पराभूत केलेले सुब्बा रेड्डी हे माजी मंत्री आहेत.

## भारत देशमचे स्वरूप

'तेलगू देशम'चे नेते मुख्यमंत्री एन.टी. रामाराव हे आपल्या पक्षाला राष्ट्रीय क्षितिज मिळाले म्हणून बेहद्द खूष आहेत. आपल्या शिष्यमंडळींचा शपथविधी पाहायला ते स्वत: लोकसभेत हजर होते. त्या वेळी भस्म लावलेल्या त्यांच्या चेहऱ्यावर 'तथास्तु' म्हणत असावेत असा भाव होता. नंतर एन.टी. रामाराव यांनी पत्रकार परिषदेत तेलगू, हिन्दी आणि इंग्रजीतून भाषण केले. त्यांनी 'भारत देशम' या आपल्या नव्या राष्ट्रीय पक्षाची कल्पना सांगितली. परंतु 'भारत देशम'ची घोषणा आकर्षक असली, तरी त्यामागील कल्पनेबाबत रामाराव यांच्या मनात गोंधळ दिसतो. नंतर त्यांच्याशी बोलल्यावर, त्यांना अनेक प्रश्न विचारल्यावर देखील ते ही कल्पना स्पष्टपणे विशद करू शकले नाहीत. राजकीय प्रादेशिक पक्षांचा महासंघ (फेडरेशन) स्थापण्याची त्यांची कल्पना आहे. ज्या राज्यात जो विरोधी पक्ष अधिक प्रभावी असेल, तो 'भारत देशम' पक्षाची त्या राज्यातील शाखा समजली जाईल. तेलगू देशमचे नाव बदलून भारत देशम ठेवले जाणार नाही; तर आंध्रमध्ये तेलगू देशम व राष्ट्रीय पातळीवर भारत देशम काम करील, असे ते म्हणाले. शरद पवार, फारूक अब्दुल्ला, रामकृष्ण हेगडे यांना बरोबर घेऊन 'भारत देशम'च्या कल्पनेचा प्रचार करायचा त्यांचा बेत आहे. पवार यांच्याशी त्यांनी चर्चा केली; तेव्हा विधानसभा निवडणुकांनंतर याचा विचार करू, असे पवार यांनी त्यांना सांगितले. एकूण रामारावांची 'भारत देशम' पक्षाची कल्पना ही कितपत व्यवहार्य ठरेल, याबद्दल विरोधी पक्षात साशंकता आहे.

## अंत:करणे हेलावली

दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना श्रद्धांजली वाहणाऱ्या ठरावावर लोकसभेत झालेल्या भाषणांनी अपेक्षित उंची गाठली नाही. अपवाद मधू दंडवते यांचा. त्यांच्या भाषणात वैचारिक दर्जा तर होताच, पण त्याबरोबरच हेलावून टाकणारा भावनेचा स्पर्शही होता. ''श्रीमती गांधींच्या निधनामुळे काँग्रेस पक्षाचा अध्यक्ष गेला, देशाने पंतप्रधान गमावला आणि खुद्द राजीव गांधी यांची माता हरपली. काँग्रेसला नवीन अध्यक्ष, देशाला नवा पंतप्रधान मिळाला; पण राजीव गांधींना पंतप्रधानपदच काय

जगातील सर्व सत्ता मिळाली, तरी त्यांची माता मात्र पुन्हा मिळणार नाही." असे दंडवते यांनी सांगताच सभागृह हेलावून गेले व अशा प्रसंगी बाके बडवायची नसतात याचे भान न राहून सत्तारूढ पक्षाच्या सदस्यांनी बाके वाजवली. नंतर दंडवते यांच्या भाषणाचे सत्तारूढ पक्षाच्या मंत्र्यांनी व सदस्यांनी खाजगी भेटीतही कौतुक केले. दुसऱ्या दिवशी सभाध्यक्षांनी नेत्यांना भोजन दिले; तेव्हा पंतप्रधान राजीव गांधी यांनी स्वत: 'तुमच्या भाषणाने माझे अंत:करण हेलावले' असं दंडवते यांना सांगितले. बांगला देश लढ्याच्या वेळी डाक्का पडले; तेव्हा एखाद्या तरुणाला शोभेशा उत्साहाने श्रीमती गांधी लगबगीने सभागृहात धावत आल्या होत्या व त्यांनी सदनाला त्याची माहिती दिली. 'त्या वेळचे त्यांच्या चेहऱ्यावरचे स्मित मला अजून आठवते आहे, असेही दंडवते यांनी सांगितले.

सभाध्यक्ष बलराम जाखर यांनीही ठराव मांडताना केलेल्या चांगल्या भाषणात श्रीमती गांधी यांच्याबरोबर १९७९ साली केलेल्या आपल्या दौऱ्यातील आठवण सांगितली. काश्मीरमध्ये एका ठिकाणी हिरवळीवर चर्चा चालली होती. आपला पक्ष परत सत्तेवर आल्यावर आपण विरोधकांबद्दल सुडाची भावना बाळगू नये, असे जाखर यांनी गांधींना म्हटले. तेव्हा मी कोणाहीबद्दल कधीही टीकात्मक शब्दाचा वापर केला आहे काय, अशी पृच्छा त्यांनी केली होती. पंतप्रधान राजीव गांधी यांनी आपल्या मातेला श्रद्धांजली वाहताना कमालीचा संयम दाखवला. ते तीनच मिनिटे बोलले. संरक्षणमंत्री नरसिंह राव यांनाही भावनावेगामुळे शब्द सुचत नव्हते. आरोग्यमंत्री मोहसिना किडवाई यांनीही भावनोत्कट भाषण केले. तेलगू देशमचे नेते माधव रेड्डी यांनाही शब्द सुचेनात. सतत 'महान' या शब्दाचा वापर त्यांनी केला. कम्युनिस्ट सरदीश राय, अण्णा द्रमुकचे कुलनदेवलू, कम्युनिस्ट पक्षाच्या गीता मुखर्जी, एन.जी. रंगा, बुटासिंग यांच्या भाषणांत विशेष काही नव्हते. शरद पवार यांनी एका जबरदस्त विश्वनेत्याचा अस्त झाला, असे म्हटले व श्रीमती गांधींनी जम्मू-काश्मीरमधील मीर कासिम यांना बाजूला व्हायला सांगून शेख अब्दुल्ला यांना पुन्हा मुख्यमंत्री केले होते, याचे स्मरण करून दिले. पवार यांचे भाषण हिंदीतून झाले. आदल्या दिवशी जाखर यांचे अभिनंदन करतानाही ते हिंदीतून बोलले. त्यांची दोन्ही भाषणे ऐकताना पवार यांना हिंदीचा खूप सराव करावा लागेल, हे जाणवले. पवार यांच्याकडून खूप अपेक्षा आहेत. त्यांचे नाव सभाध्यक्षांनी पुकारताच काही अपेक्षेने खासदारांचे कान टवकारले जातात. या अपेक्षा अजून तरी पुऱ्या झालेल्या नाहीत.

## फ्रँक अँथनींचा बेरंग

दलित मजदूर किसान पक्षाचे चरणसिंग हे या शब्दांजलीच्या वेळी सभागृहात हजर होते. पण त्यांनी भाषण केले नाही, हे खटकले. त्यांच्या पक्षाच्या वतीने महबूब अली बोलले. हंगामी सभाध्यक्ष जगजीवनराम हे या वेळी हजर नव्हते.

नियुक्त सभासद फ्रँक अँथनी यांनी तर या प्रसंगाचे गांभीर्य लक्षात न घेता जनता राजवटीवर केलेल्या शेरेबाजीमुळे बेरंगच झाला. जनता काळात श्रीमती गांधींवरील

चौकशी आयोगाचा त्यांनी उल्लेख केला; तेव्हा इंदिरा काँग्रेसचे भगवत झा आझाद संतापले व त्यांनी 'या प्रसंगाचे गांभीर्य बिघडवू नका, तुमचे असले भाषण आम्ही ऐकणार नाही' असे अँथनी यांना सांगितले. त्या वेळी बुटासिंग मात्र 'अँथनी हे इतिहासात जे घडले तेच सांगत आहेत' असे म्हणत होते. अँथनींच्या भाषणामुळे जनता पक्षाचे आंध्रमधील खासदार जयपाल रेड्डी हे खवळले व त्यांनीही जोरदार आक्षेप घेतला. सभाध्यक्ष जाखरही काहीसे वैतागलेले दिसत होते. त्यांनी वारंवार सांगूनही अँथनी आपले भाषण आटोपते घेईनात. श्रीमती गांधींनी आपल्या वाढदिवसाला कशा शुभेच्छा पाठवल्या, आपल्या आजारी पत्नीची कशी विचारपूस केली याची माहिती देऊन त्यांनी उगीच लांबण लावली. त्यांचे भाषण श्रीमती गांधींपेक्षा स्वत:बद्दलच अधिक होते. एकूण या ठरावावरील भाषणे पाहता श्रीमती इंदिरा गांधी यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू फारच कमी वक्त्यांना शब्दांत पकडता आले आणि याहून अधिक चांगली भाषणे व्हायला हवी होती, असे वाटत राहिले.

## चेतना, चिता, रक्ताक्षर

राज्यसभेत श्रद्धांजली वाहणाऱ्या ठरावावर सर्वोत्कृष्ट भाषण अर्थमंत्री विश्वनाथ प्रतापसिंग यांचे झाले. ते स्वत: कवी असल्याने त्यांच्या शैलीत लालित्य आहे. अटलबिहारी वाजपेयी यांच्या हिंदीची, कधी कधी त्याहीपेक्षा सरस शैलीची प्रतापसिंग यांनी आठवण करून दिली. श्रीमती इंदिरा गांधी राष्ट्रीय चेतनेचा एक अंश बनल्या होत्या आणि 'चेतना को चिता नहीं जला सकती, जो कोटी कोटी दिलों में आज भी जीवित है' असे ते म्हणाले. "श्रीमती गांधी हे जे 'रक्ताक्षर' सोडून गेल्या त्याला कोणीही मिटवू शकणार नाही. स्वयं कालाचा अकाली मृत्यू होईल. दधीची ऋषीप्रमाणे त्यांनी देशाला आपल्या अस्थी दान केल्या. सीमेवर त्या 'चंडी' होत्या तर गरिबांसाठी 'चंदन' होत्या." असे ते म्हणाले.

## कलावंतांभोवती घोळका

लोकसभेच्या बैठकीच्या पहिल्याच दिवशी कॉरिडॉरमध्ये चित्रपट कलावंतांभोवती जमलेला घोळका पाहताना विचित्र वाटत होते. एखाद्या चित्रपटाच्या प्रिमियर शोच्या वेळी कॉरिडॉरमध्ये जसे वातावरण असते, तसे हे वातावरण होते. सुनील दत्त यांनी दहा जणांना लोकसभेचे कामकाज पाहायला बोलावले होते. (प्रत्येक खासदाराला दोघांचा पास काढण्याची मुभा असते.) त्यांत राजेंद्रकुमार, संजय खान, संजय दत्त, कुमार गौरव, त्याची पत्नी नम्रता आणि नातेवाईक व मित्रमंडळी होती. त्यांच्याभोवती कॉरिडॉरमध्ये स्वाक्षरी घेण्यासाठी झुंबड उडाली होती. त्यात लोकसभेचे कर्मचारी व कामकाज पाहायला आलेली प्रेक्षक मंडळी होती. आम्ही प्रथमच संसद भवनात आलो आहोत, असे राजेंद्रकुमार व संजय खान यांनी सांगितले; तर माझी आई नर्गिस राज्यसभेची सदस्य असताना मी संसद भवनात दोन-चारदा आलो होतो, असे संजय दत्त

म्हणाला. या मंडळींभोवती नंतर गर्दी एवढी वाढली की, सभाध्यक्षांच्या कार्यालयातील प्रतीक्षा दालनात ही सर्व मंडळी जाऊन बसली. संजय दत्त सिगरेट ओढण्यासाठी बाहेर येऊन बसला होता. सुनील दत्त सेंटॉर हॉटेलमध्ये उतरले होते आणि लोकसभा कामकाजाची कागदपत्रे आपल्याला मिळाली नाहीत, अशी तक्रार 'टेबल ऑफिसर'कडे करीत होते. सुनील दत्त बुजल्यासारखे वाटत होते, तर वैजयंतीमाला उत्साहाने सर्वत्र हिंडत होत्या आणि अमिताभ बच्चन शांतपणे सभागृहात दोन्ही दिवस बसून होते. या कलावंत मंडळींनी आपण अन्य खासदारांपैकी एक खासदार आहोत याचे भान बाळगायला हवे आणि संसदेच्या कर्मचाऱ्यांनीही त्यांच्या पुढे पुढे करण्यात धन्यता मानू नये.

### पंतप्रधान मागे आले

पहिल्याच दिवशी पंतप्रधानांनी भाषणे ऐकण्यासाठी इयरफोन कानाला लावला तेव्हा एका बाजूने बटन निखळून पडले. ते त्यांनी टेबलावर ठेवून दिले, तेव्हा मागच्या बाकावर बसलेल्या केंद्रीय मंत्र्याने त्यांना लागलीच आपला इयरफोन देऊ केला. त्या वर तो नम्रपणे नाकारून राजीव गांधींनी बटन पुन्हा बसवून आपला इयरफोन दुरुस्त केला. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाला पंतप्रधान या नात्याने हजर राहण्याची राजीव गांधींची ही पहिलीच वेळ. सेंट्रल हॉलमध्ये दोन्ही सदनांच्या संयुक्त बैठकीपुढे राष्ट्रपतींचे अभिभाषण झाले, तेव्हा व्यासपीठावर राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि लोकसभाध्यक्ष या तिघांनीच बसावयाचे असते. पंतप्रधान हे त्यांच्या समोरच्या रांगेत पहिल्या बाकावर नेहमी बसतात. राजीव गांधींना ही प्रथा ठाऊक नसावी. त्यामुळे राष्ट्रपतींबरोबर ते मिरवणुकीने सभागृहात आले व तसेच त्यांच्यासमवेत व्यासपीठावर निघाले. पण पायऱ्या चढण्यापूर्वीच त्यांना आपली चूक उमगली व ते मागे फिरले आणि पहिल्या बाकावर जाऊन बसले. त्यांच्या शेजारी नरसिंह राव व विश्वनाथ प्रतापसिंग बसले होते. माजी अर्थमंत्री प्रणव मुकर्जी हे सर्वांत शेवटच्या बाकावर बसले होते. तसेच त्याही मागे मांडलेल्या जादा खुर्चीवर चरणसिंग, अमिताभ बच्चन व के.पी. सिंगदेव बसलेले दिसत होते.

गेल्या आठवड्यात संसदेत वातावरण तसे खेळीमेळीचे होते. खासदार मंडळी एकमेकांचे अभिनंदन करण्यात, शुभेच्छा देण्यात गुंतलेली होती. हास्य-विनोदाने गप्पा रंगत होत्या. सभाध्यक्ष बलराम जाखर यांनी सदनाच्या अध्यक्षपदाच्या पॅनेलवर एखाद्या सीतेला घ्यावे म्हणजे 'रामराज्य' होईल, असे मधू दंडवते यांनी सुचवले होते. त्यानंतर जाखर पत्रकारांना भेटले. तेव्हा तुम्ही एखाद्या हनुमानाला अध्यक्षीय पॅनेलवर घ्यायला हवे, असे एका पत्रकाराने सुचवले. त्यावर राजनारायण यांचे नाव न घेता, पण मला असा हनुमान नको की जो माझ्याच लंकेला आग लावील, असे सांगून जाखर यांनी हशा पिकवला.

### कॉफी क्लबचे पुनरुज्जीवन

या संसद अधिवेशनात कॉफी क्लबचेही पुनरुज्जीवन करण्यात आले. उपराष्ट्रपती

व राज्यसभेचे सभापती व्यंकटरामन हे मंत्री असताना नेहमी हॉलमध्ये येत व पत्रकारांशी गप्पागोष्टी करत. तो एक अनौपचारिक 'कॉफी क्लब'च बनला. पुढे व्यंकटरामन यांची उपराष्ट्रपतिपदावर निवड झाली. तेव्हा आता ते सेंट्रल हॉलमध्ये येणार नाहीत व हा कॉफी क्लब बंद पडणार अशी शंका होती. पण ही परंपरा चालू ठेवीन, हे आपले आश्वासन व्यंकटराम्न यांनी पाळले व १६ जानेवारीला त्यांच्याच खोलीत 'कॉफी क्लब'चे पुनरुज्जीवन झाले. राजाजी यांना एकदा स्वत:च मांडलेल्या दुरुस्ती प्रस्तावावर कसे विरोधी मतदान करावे लागले होते, याचा किस्सा व्यंकटरामन यांनी ऐकवला. तसेच राज्यसभेत एकदा एका महिला खासदारांनी तुम्ही आमच्याकडे पाहतच नाही, अशी तक्रार सभापतींकडे केली; त्या वेळी सभापती म्हणाले, ''मी तुमच्याकडे फार पाहू लागलो, तर माझ्या घरी अडचण निर्माण व्हायची.'' हा त्यांनी वर्णिलेला किस्साही मजेशीर होता.

□

**– अशोक जैन**

**('राजधानीतून ... २' या पुस्तकातून)**